**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ११ डिसेंबर २०२३**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६९३/२०२३ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०५/१२/२०२३ रोजी १७.४५ वा. एस.टी.स्टॅन्ड सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १०/१२/२०२३ रोजी २२.५५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | महेश राजकुमार तोग्गी,वय-२९ वर्षे,रा- मुपो अणदुर ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | १४,०००/- रू चे स्काय ब्ल्यु रंगाचा विवो कंपनीचा वी-२१०१ मॉडलेचा मोबाईल. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि ०५/१२/२०२३ रोजी १७.४५ वा. एस.टी.स्टॅन्ड सोलापूर येथे सोलापूर ते अणदुर जाणारे एस.टी.मध्ये यातील फिर्यादी चढत असताना फिर्यादीचे पाठीवर असलेली बॅग कोणीतरी ओढल्यासारखे जाणवले त्यामुळे फिर्यादी एस.टी.मध्ये बसल्यानंतर बॅग तपासली असता बॅगची चैन उघडी दिसली त्यामुळे त्यातील नमुद वर्णनाचा व किंमतीचा मोबाईल तपासला असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने तो फिर्यादीचे संमतीवाचुन मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे.म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १२३२/चुंगे- ९५११२९५१४१ |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७८१/२०२३ भादवि ३२३,५०४,५०६,१४३,१४७,१४९,३४प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०९/१२/२०२३ रोजी २०.०० वा चे सुमारास पेंढारी मस्जिद जवळ मुर्गीनाला सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १०/१२/२०२३ रोजी २०.१७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | आसिफ अलिबाग शेख,वय-३२ वर्षे,रा- ६५०,उत्तर सदर बझार दाळगल्ली सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) तन्वीर सय्यद,२) मुनीर सय्यद, ३) खुर्शीद सय्यद, ४) चॉदसाब सय्यद, ५) जिन्नत शेख सर्व रा- पेंढारी मस्जिद जवळ मुर्गीनाला सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि ०९/१२/२०२३ रोजी २०.०० वा चे सुमारास पेंढारी मस्जिद जवळ मुर्गीनाला सोलापूर येथे यातील फिर्यादी हे त्यांची पत्नी हिस घरी घेवून जाण्यासाठी सासरी गेले असता फिर्यादीचे सासरे आरोपी क्र ४ यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून मुलीला तुझ्यासोबत पाठविणार नाही असे म्हणून मारहाण करण्यास सुरूवात केली त्यानंतर यातील आरोपी क्र १,२,३,५ यांनी गैरकायदयाची मंडळी जमवून फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण व शिवीगाळ करून दमदाटी केली आहे.म्हणून. तपास:- पोह/९८७/कंचे-८३७८९८०९८७ |